क्र. २२/७डी/एल ४४६
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
बी. एस. आर. डी. ए. इमारत २रा मजला, वांद्रे (पूर्व)
मुंबई ४०० ०५१.

दिनांक – १५-६-१९९६

वाचा– शासन महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. एलएनडी २६८५/१३८०/प्र.क्र. १०३/
ज-३ दिनांक १०.६.१९९६

आदेश
======

मौजे चेंबूर येथील स.नं. १४ न.भू.क्र. ४६ मधील सुमारे १००० चौ.मी. जमीन मिश्रीलालजी परिहार मेमोरियल वेल्फेअर सेंटरला रुग्णालयासाठी देण्या बाबत शासन पत्र क्र. एलआरएफ १९८३२३२/३५१५/ग-८ दिनांक २७.५.८३ अन्वये हेतुपत्र देण्यात आले आहे. तद्नंतर प्रस्तुत जमिनीचे संभाव्य अतिक्रमणापासून संरक्षण करण्याकरिता कुंपण घालण्याची परवानगी देखील संस्थेला देण्यात आली आहे. प्रस्तुत जमिनीचे सुधारित अभिन्यासातील क्षेत्र ९१० चौ.मी. असल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१/व शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ १०८९/७२८४/सीआर १९/ज-१ दिनांक २२.६.९० मधील अटी व शर्तीवर तसेच शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ १०९२/प्र.क्र. ८५८ ज-१ दिनांक २०.७.१९९२ मधील तरतुदीनुसार मिश्रीलालजी परिहार मेमोरियल वेल्फेअर सेंटरला धर्मादाय रुग्णालयासाठी भू.क्र.३ मधील सुमारे ९१० चौ.मी. या प्रत्यक्ष मोजणी नंतर निश्चित क्षेत्र होईल तेवढे क्षेत्र भुईभाडे आकारुन खालील अटी शर्तीवर तसेच सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केलेल्या अटीवर ३० वर्षांचे भाडेपट्ट्याने देण्यात मंजूरी देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत जमिनीचे भुईभाडे जमिनीची आजची बाजारभावाची तात्पुरती किंमत प्रती चौ.मी.ला रु.३५००/- इतकी गृहीत धरुन पूर्ण बाजार भावाच्या ५० % किमतीच्या प्रती वर्षी १५ % दराने तात्पुरता प्रतिवर्षी वार्षिक भाडेपट्टा रक्कम रु. २,३२,५६४/- (रु. दोन लाख बत्तीस हजार पाचशे चौसष्ट मात्र) आकारण्यात येत आहे. संस्थेने सदर भाडे प्रती वर्षी भरणा करावे व पुढील अटी मान्य व बंधनकारक असल्याचे रु.१०/- च्या मुद्रांकित पेपरवर हमीपत्र या कार्यालयाकडे सादर करावे.

......२/-

TRUE COPY

२.

Scanned by CamScanner

२. वरील प्रमाणे आकारण्यात आलेली भाडेपट्टयाची रक्कम ही तात्पुरती आहे. नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग यांनी प्रश्नांकित जमिनीची अंतिम किंमत निश्चित केल्यानंतर तात्पुरती भाडेपट्टयाची रक्कम आणि अंतिम भाडेपट्टयाची रक्कम यातील फरकाची रक्कम त्यावरील प्रचलित दराने देय ठरणाऱ्या व्याजासह भरण्यास संस्था तयार आहे.

३. भूईभाडयाच्या दराचे पुनर्विलोकन दर दहा वर्षांनी त्यावेळी असलेल्या प्रचलित बाजार भावाच्या किंमतीवर आकारण्यात येईल.

४. प्रस्तुत जमिनीवर अतिक्रमणे असल्यास अतिक्रमणदारांना संस्था स्वतःच्या खर्चाने पर्यायी जागा देईल अथवा त्यांच्या पुनर्वसनाचा भार शासनावर न लादता संस्था तो प्रश्न सोडविल.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे:

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

विश्वस्त,
मिश्रीलालजी परिहार मेमोरियल वेल्फेअर सेंटर

मंगल आनंद हॉस्पिटल, ४८ स्वस्तिक पार्क,
सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

Scanned by CamScanner

[ शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलआरएफ १०८९/ ७२८७/सीआर-१९/ज-१ दिनांक २२ जून १९९० चे जोडपत्र ]

परिशिष्ट - " अ "

महानगर क्षेत्रातील शासकीय जमीनी स्वयंसेवी संस्था/खाजगी संस्था विविध विश्वस्त मंडळे व इतर धर्मादाय संस्था यांना रुग्णालयाच्या बांधकामासाठी प्रदान करताना घालावयाच्या अटी आणि शर्ती:-

१. स्वयंसेवी संस्था/खाजगी संस्था/विविध विश्वस्त मंडळे व इतर धर्मादाय संस्था यांना शासकीय जमिनी नाममात्र रु. १/- भोगाधिकार मूल्य आकारुन देण्यात येईल.

किंवा

शासकीय जमीन वार्षिक नाममात्र रु. १/- भाडेपट्टा आकारुन प्रथमत: ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने देण्यात येईल. सदर भाडेपट्टयाचे पुढील वर्षांसाठी शासन ठरवतील त्या अटी व शर्तींवर नुतनीकरण करता येईल. जर जमीन पुन:प्रापण अथवा विकसित केलेली असेल तर पुन:प्रापण करण्यासाठी अथवा विकास करण्यासाठी झालेला खर्च प्रतीगृहीताकडून/पट्टेदाराकडून वसूल करण्यात येईल. मुंबई शहरात शासकीय जमिनी फक्त भाडेपट्टयानेच देण्यात याव्यात.

२. महानगर पालिका क्षेत्रात असलेल्या शासकीय रुग्णालयामार्फत जो आकार /फी घेतला जातो/घेतली जाते तेवढाच आकार /फी बाहय रुग्ण विभागातील रुग्णांकडून घेण्यात यावा/यावी.

३. ज्या रुग्णाचे मासिक उत्पन्न रु. ९८०/- किंवा सार्वजनिक आरोग्य विभाग वेळोवेळी ठरविल तेवढया रक्कमेच्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल तर अशा रुग्णाला, मग तो बाहय रुग्ण असो वा आंतररुग्ण असो, काहीही फी आकारण्यात येऊ नये.

३- अ एकूण खाटांपैकी १५ टक्के खाटा विनामूल्य सेवेसाठी रुग्णालयाने उपलब्ध कराव्यात व १५ टक्के खाटांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दराने सेवा उपलब्ध करावी. उर्वरित खाटांसाठी किती आकार का लावावयाचा हे ठरविण्याची रुग्णालयाना मुभा राहील.

रुग्णालयासाठी तळपृष्ठ निर्देशांकात वाट करुन मिळाल्यास ज्या वाटीव खाटा उपलब्ध होती त्यापैकी १५ टक्के खाटा विनामूल्य सेवेसाठी व १५ टक्के खाटा सार्वजनिक आरोग्य विभागाने निश्चित केलेल्या दराने उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

.....२/-

Scanned by CamScanner

२. वरील प्रमाणे आकारण्यात आलेली भाडेपट्टयाची रक्कम ही तात्पुरती आहे. नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग यांनी प्रश्नांकित जमिनीची अंतिम किंमत निश्चित केल्यानंतर तात्पुरती भाडेपट्टयाची रक्कम आणि अंतिम भाडेपट्टयाची रक्कम यातील फरकाची रक्कम त्यावरील प्रचलित दराने देय ठरणा-या व्याजासह भरण्यास संस्था तयार आहे.

३. भूईभाडयाच्या दराचे पुनर्विलोकन दर दहा वर्षांनी त्यावेळी असलेल्या प्रचलित बाजार भावाच्या किंमतीवर आकारण्यात येईल.

४. प्रस्तुत जमिनीवर अतिक्रमणे असल्यास अतिक्रमणादाराना संस्था स्वत:च्या खर्चाने पर्यायी जागा देईल अथवा त्यांच्या पुनर्वसनाचा भार शासनावर न लादता संस्था तो प्रश्न सोडविल.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे:

प्रति,
विश्वस्त,
मिश्रीलालजी परिहार मेमोरियल वेल्फेअर सेंटर
मंगल आनंद हॉस्पिटल, ४८ स्वस्तिक पार्क,
सायन ट्राँम्बे रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

Scanned by CamScanner